


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









# औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी आ.खताळ यांचा उद्योग मंत्री सामंत यांच्याकडे पाठपुरावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

वर्षानुवर्षे मूलभूत सुविधांच्या प्रतीक्षेत असलेल्या संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी आमदार अमोल खताळ यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे १० कोटी रुपयांचा प्रस्तावित निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. औद्योगिक वसाहतीची सद्यस्थिती गांभीर्याने घेत मंत्री उदय सामंत यांनी याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवली असून, निधी उपलब्धतेसाठी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या जाणार असल्याची ग्वाही दिली.

महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री तथा शिवसेना पक्षाचे संपर्क मंत्री उदय सामंत यांनी ७ मे रोजी अहिल्यानगर जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी संगमनेर येथे आमदार अमोल खताळ यांच्या निवासस्थानी तसेच जनसंपर्क कार्यालयाला भेट दिली. दरम्यान, संगमनेर मतदारसंघातील विविध राजकीय, सामाजिक आणि विकासासंदर्भातील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तसेच शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत मंत्री सामंत यांनी त्यांना मार्गदर्शन केले.



> सहकारी औद्योगिक वसाहतीचा विकास हा संगमनेरच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया आहे. अनेक वर्ष प्रलंबित विकासकामांना मंजुरी मिळाल्यास संगमनेर औद्योगिक वसाहत आधुनिकतेकडे वाटचाल करत सुरक्षित आणि सुसज्ञ रोजगारनिर्मितीचे नवे केंद्र बनेल असा विश्वास आहे.
>
> **- आमदार अमोल खताळ**

दरम्यान, आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीमधील पायाभूत सुविधांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीकडे उद्योग मंत्री सामंत यांचे लक्ष वेधले. औद्योगिक वसाहतीचा विकास आराखडा अद्याप तयार करण्यात आला नसून पायभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, वीजपुरवठा तसेच आपत्ती व्यवस्थापन याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळे तेथील उद्योजक आणि कामगारांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, जलनिस्सारण व्यवस्था आणि पथदिवे यांची गरज भासत आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणे महत्वाचे असून उद्योजकांना मोकळ्या आणि सुरक्षित वातावरणात व्यवसाय करता यावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे आ. खताळ यांनी उद्योग मंत्री सामंत यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच यासंदर्भात वर्षानुवर्ष सत्ताकेंद्र असलेल्या संचालक मंडळाकडून कोणतीही ठोस उपाययोजना झाली नसल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. संगमनेर औद्योगिक वसाहतीच्या विकास निधीसाठी यापुर्वी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला असून ७ ऑक्टोबर २०२५ रोजी उद्योग केंद्र, अहिल्यानगर यांनी आवश्यक असलेल्या १० कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभागीय कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. या प्रस्तावाला तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता देण्याचे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडून देण्यात आले असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# चुका तुमच्या, भुर्दंड आमच्या माथी का ?

## राज ठाकरेंचा पत्रातून मोदींना सवाल

मुंबई (वृत्तसंस्था)



देशातील वाढती महागाई, इराण-इस्त्रायल युद्धामुळे वाढलेले कच्च्या तेलाचे भाव आणि ढासळती अर्थव्यवस्था या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना काटकसर करण्याचे आवाहन केले.

मात्र या आवाहनानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पंतप्रधानांना खरमरीत पत्र लिहित आरसा दाखवला आहे. चुका तुमच्या आणि भुर्दंड जनतेला का? असा जळजळीत सवाल करत राज ठाकरेंनी या पत्राद्वारे सत्ताधाऱ्यांच्या दुटप्पी भूमिकेवर कडाडून टीका केली आहे. सामान्य जनतेला सल्ले देण्याऐवजी सरकारने स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करावी असा सल्ला राज यांनी या पत्रातून दिला आहे.


मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहित म्हंटले आहे की, सस्नेह जय महाराष्ट्र, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी दोन दिवसांपूर्वी तमाम भारतीयांना काटकसर करण्याचं आवाहन केलं. सोनं खरेदी कमी करा किंवा जवळपास थांबवाच, परदेशात गरज नसेल तर जाऊ नका, पेट्रोल डिझेलचा वापर कमी करा, विजेवर चालणाऱ्या गाड्या जास्त वापरा, वर्कफ्रॉम होमचा पर्याय स्वीकारा इत्यादी. हे सगळं का ? तर, सोनं, पेट्रोल डिझेल हे आयात करावं लागतं आणि त्यात विदेशी गंगाजळी मोठ्या प्रमाणवर खर्च होते. आणि सध्या इराण युद्धामुळे खनिज तेलाचे भाव प्रचंड वाढलेत. बरं, मग स्वतः पंतप्रधान आणि त्यांचे सगळे सहकारी देशभर काही शे गाड्यांचा ताफा घेऊन मिरवणुका काढत आहेत स्वतःवर फुलं उधळून घेत आहेत त्याचं काय करणार आहात आपण?

आमच्याकडून चूक झाली त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून, यापुढे माझ्यासकट कोणीही काही असं करणार नाही असं सांगणार आहात का ? चुका तुमच्या, आणि त्याचा भुर्दंड जनतेला का? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे....

(पान ४ वर)

# भंडारदरा धरणामध्ये ३५ टक्के पाणीसाठा

## धरणातून शेतीसाठी ११११२ क्युसेसने विसर्ग सुरू


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - भंडारदरा धरणांमधील पाण्याची अवस्था खालावली असून भंडारदरा परिसरात उन्हाची तीव्रता अधिक असल्यामुळे धरणातून बाष्पीभवनाचे प्रमाण वाढत असल्यामुळे धरण साठा कमी होत आहे. भंडारदरा धरणामध्ये अवघे ३५ टक्के पाणी शिल्लक राहिले असून पावसाळा सुरू होण्यास आणखी एक महिन्याचा कालावधी असतानाच भंडारदऱ्याचा पाणीसाठा आणखी कमी होण्याची शक्यता धरण शाखेकडून वर्तवण्यात आली आहे.

सोमवारी संध्याकाळी भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ४२२५ दशलक्ष घनफुट शिल्लक राहिला आहे. मागील वर्षी याच तारखेला भंडारदरा धरणामध्ये ४३६४ दशलक्ष घनफुट पाणी शिल्लक होते. भंडारदरा परिसरात अवकाळी पाऊसही म्हणावा असा पडला नसल्याने कोणत्याही प्रकारची नवीन पाण्याची आवक धरणामध्ये झालेली नाही. भंडारदरा धरणांमधून धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये शेतीसाठी पाणी सोडले असून त्यामुळे आणखी पाणीसाठा कमी होणार आहे. त्यामध्ये यावर्षी पाऊस वेळेवर सुरू होणार नसल्याचे संकेतही हवामान खात्याकडून उपलब्ध होत आहेत. भंडारदरा धरणाच्या लाभक्षेत्रात उन्हामुळे पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. त्यामध्येच शाळेला लागलेल्या सुट्ट्यांमुळे भंडारदऱ्याला पर्यटक भेट देत आहेत. त्यामुळे भंडारदरा धरणाच्या अम्ब्रेला धबधब्यामधून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी व्यापारी व पर्यटक सुद्धा करत आहेत.मागील वर्षी सुद्धा भंडारदऱ्याच्या अम्ब्रेला धबधब्यामधून पाणी सोडण्यात आल्यामुळे भंडारदऱ्याला पर्यटकांची गर्दी वाढली होती. अम्ब्रेला धबधबा सोडण्याची व्यापारी व पर्यटकांची ही मागणी शासन दरबारी सादर करणार असल्याची माहिती भंडारदरा धरणाचे शाखाधिकारी सागर ढोकणे यांनी दिली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीशिवाय मंत्र्यांना विमान प्रवास नाही

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंजूरी घेतल्याशिवाय राज्यातील मंत्र्यांना विमान वापरता येणार नाही, असा सूचना देण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर राज्यात अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मंजुरी शिवाय विमान वापरता येणार नाही, अशा सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

- एखाद्यावेळी तातडीने कुठे जायचं असेल तर मी विमान वापरतो. माझ्या वर्षभरात चार-पाच वेळा तातडीचे काम असते तेव्हाच विमानाने जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खूप व्यस्त असतात, म्हणून ते विमान वापरतात, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. आता मुख्यमंत्र्यांच्या मंजूरी शिवाय मंत्र्यांना विमान वापरता येणार नाही असं चंद्रशेखर बावनकुळेंनी सांगितले. तसेच माझ्या जास्तीत जास्त बैठका ऑनलाइन असतात. मी जिल्हाधिकारी, अधिकाऱ्यांना बोलवत नाही. मी ऑनलाइन बैठका घेऊन तोडगा काढतो, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. देवेंद्र फडणवीसांच्या सूचनेनुसार मंत्री नितेश राणेंनी मस्त्य विकास व बंदर विभागाला निर्देश दिले आहेत. मस्त्यविकास, बंदर विभागाच्या सर्व बैठका आता ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. देवेंद्र फडणवीसांच्या सूचनेनुसार मंत्री नितेश राणेंकडून मस्त्य विकास व बंदर विभागाला निर्देश दिले. पेट्रोल व डिझेल ऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करा, अशा सूचनाही नितेश राणेंनी अधिकाऱ्यांना दिल्या. एकंदरीत पाहता, या सर्व घटकांमुळे सरकारवर आपला डॉलर साठा जपून ठेवण्याचा दबाव वाढला आहे. याचे कारण असे की, जेव्हा जेव्हा भारत वस्तूंची आयात करतो, उदा. तेल, वायू (गॅस), सोने किंवा खते तेव्हा त्याचे पेमेंट (पैसे) डॉलरमध्ये केले जाते. परिणामी, जेव्हा वस्तूंच्या किमती वाढतात, तेव्हा अधिक प्रमाणात डॉलर खर्च करावे लागतात. यामुळे परकीय चलन साठ्यावर ताण येतो आणि रुपयाची स्थिती कमकुवत होते.

# झेडपी निवडणूका पुन्हा लांबणीवर

## आता सुनावणी जुलैमध्ये, इच्छुकांचा हिरमोड

नवी दिल्ली - (वृत्तसंस्था)



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ५० टक्के आरक्षण मर्यादा वादावरुन टांगती तलवार कायम आहे. आरक्षण मर्यादेच्या अडचणीमुळे काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अजुनही प्रलंबित आहेत. या पार्श्वभुमीवर सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी २१ आणि २२ जुलैला होणार आहे.

दरम्यान, बीड आणि जालना जिल्ह्यांमध्ये निवडणूका घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आले होते. बीड आणि जालना जिल्ह्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली नाही, त्यामुळे या दोन जिल्ह्यांमध्ये निवडणूका जाहीर करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला देण्यात यावे, अशी विनंती करणारा अर्ज न्यायालयात दाखल करण्यात आला होता. सदर अंतरिम अर्ज सोमवारी सुनावणीस आल्यानंतर आगामी सुनावणीतच हे प्रकरण बघु असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. त्यामुळे येत्या २१ आणि २२ जुलैला होणाऱ्या सुनावणीतच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांवर सुनावणी होणार असल्याचे दिसते. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीचा विषय न्यायालयात असताना काही ठिकाणी निवडणुका झाल्या आहेत. यापूर्वी ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या आहते, त्या सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असे यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट सांगितले आहे.

तर इतर ठिकाणी जिथे आरक्षण टक्केवारीचे अडचण आहे तेथील निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे या प्रकरणावर न्यायालय काय भूमिका घेणार किंवा निर्णय देणार हे लक्षवेधी असणार ठरणार आहे.









# अकरावी प्रवेशाचा फज्जा !

## पहिल्याच दिवशी सर्व्हर डाऊन




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दहावीचा निकाल लागल्यानंतर अकरावी ऑनलाईन प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. सोमवारपासून पोर्टल सुरळीत सुरू होईल, असा दावा शिक्षण खात्याने केला होता. परंतू, व्यवस्थापन, इनहाऊस व अल्पसंख्यांक कोट्यासाठी झिरो राउंड सुरू असतानाच सर्व्हर डाऊन झाले. भाग एक नोंदवल्यानंतर पुढे कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम भरता आला नाही.

दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे, जिल्ह्यात ६३ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना अकरावी प्रवेशासाठी तब्बल ९८ हजार ५९० जागा आहेत. उत्तीर्णच्या तुलनेत प्रवेशाची क्षमता अधिक असल्याने सर्वांना प्रवेश मिळणार आहे. परंतू, ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या धोरण घेतले असतानाच सव्र्हर डाऊनमुळे प्रक्रिया कोलमडली आहे. ८ मे पासून विद्यार्थी नोंदणी व भाग एक ऑनलाईन सादर करण्यासाठी १० मेपर्यंत मुदत होती. ११ मे पासून शैक्षणिक पात्रतेची माहिती भरून अर्जाचा भाग एक सादर करणे, विद्यार्थी एकाचवेळी भाग दोनसाठी ऑनलाईन अर्ज करू शकतो. परंतू, पात्रतेची माहिती भरल्यानंतर पुढील टप्प्यातील प्रक्रिया होत नाही. तसेच काहीजणांना शैक्षणिक पात्रता भरण्यात अडचणी आल्याचेही दिसून आले. झिरो राउंडसाठी किमान एक व कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालय निवडही करता आली नाही. १४ मे ते १५ मे या कालावधीत तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता सुची जारी करण्याचे नियोजन आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात अकरावीचे वर्ग सुरू करण्यासाठी प्रशासकीय प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान मागील वर्षी प्रवेश प्रक्रियेत सर्व्हर डाऊनचा अडथळा आला होता. त्यामुळे नियोजितवेळी अकरावीचे वर्ग सुरू करण्यात अडचणी आल्या होत्या. त्यावेळी ५० टक्के प्रवेश झाल्यानंतर अथवा १५ जुलै यापेक्षा जास्त जवळच्या तारखेला अकरावीचे वर्ग सुरू करण्याचे निर्देश दिले. परंतू, संपूर्ण प्रवेश प्रक्रिया डिसेंबर-जानेवारीपर्यंत सुरू राहिली. तीच स्थिती पुन्हा उद्भवून विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी पोर्टल सुरळीत सुरू ठेवण्याची मागणी विद्यार्थी वर्गातून होत आहे.

# अमृतवाहिनी सह. बँकेस उत्कृष्ट डिजिटल व्यवस्थापन पुरस्कार




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक कामगिरी असलेल्या अमृतवाहिनी बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून बँकेच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल पुणे येथे ऑल इंडिया सहकारी बँक संमेलनामध्ये उत्कृष्ट डिजिटल व्यवस्थापन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

पुणे येथे ट्रस्ट इन्फो मीडिया यांच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑल इंडिया सहकारी बँक संमेलन २०२६ या कार्यक्रमात संगमनेर येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेस उत्कृष्ट डिजिटल व्यवस्थापन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी अध्यक्ष गौतम नवीन, फेडरेशनचे राज्य अध्यक्ष अजय ब्रम्हेच्या, प्रसार भारतीचे राज्य अधिकारी उदय जोशी यांच्यासह विविध मान्यवर होते. बँकेच्या वतीने चेअरमन सुधाकर जोशी, व्हा. चेअरमन ड.नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराथी, अंकुर काळे, अमित नारायण यांच्यासह आयटी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अमृतवाहिनी सहकारी बँकेने सभासद व नागरिकांना अत्यंत आधुनिक व चांगल्या सुविधा देताना बँकेमध्ये यूपीआय पेमेंट,एटीएम,आयएमपीएस,मोबाईल बँकिंग या सर्व गोष्टी ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. याचबरोबर अत्यंत सूक्ष्म पद्धतीने नियोजन करून कुठल्याही ग्राहकाची काहीही तक्रार येणार नाही याची काळजी बँकेने घेतली आहे. बँकेचे महिन्याला ५० कोटी पेक्षा जास्त डिजिटल व्यवहार होत आहेत.

या पुरस्कारानंतर बोलताना चेअरमन सुधाकर जोशी म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षांमध्ये बँकेने बाराशे कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला असून बँकेचा नफा ११ कोटी १७ लाख रुपयांवर पोहोचलेला आहे. हे सर्व करत असताना बँकेने उत्कृष्ट कर्ज व्यवहार स्थापन करत बँकेचा नेट एनपीए शून्य टक्के राखला आहे. सर्व ग्राहकांना डिजिटल सुविधा पुरविले असून कोणाची तक्रार येणार नाही याची सातत्याने काळजी घेतली आहे. वर्षाला सुमारे ६०० कोटींपेक्षा जास्त डिजिटल व्यवहार बँकेमधून होत असून या कामाची दखल घेत हा पुरस्कार मिळाला आहे यापुढील काळातही सर्वोत्कृष्ट काम करण्यासाठी या पुरस्काराने नक्कीच ऊर्जा मिळेल. याचबरोबर सांघिक कामातून हे यश मिळाले असल्याचे ते म्हणाले.

अमृतवाहिनी बँकेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल बँकेचे मार्गदर्शक मा. महसूल व शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, अ‍ॅड. माधवराव कानवडे, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, इंद्रजीत थोरात, शंकरराव खेमनर, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, संपतराव डोंगरे, बाबा ओहोळ, डॉ. मैथिलीताई तांबे, राजेश मालपाणी यांच्यासह अमृतवाहिनीच्या सर्व संचालक मंडळ आणि विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्रात अवैध भूखंडांवर कारवाई

## परवानगीशिवाय भूखंड विकल्यास तुरुंगवास



मुंबई (वृत्तसंस्था)

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अवैध भूखंडांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. जमिनीच्या व्यवहारातील फसवणुकीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्रात जुलैपासून 'भू-मालकी हक्क कायदा' लागू होणार आहे.महाराष्ट्र सरकारने अवैध भूखंड, जमिनीच्या खरेदी-विक्रीतील फसवणूक आणि भू-अभिलेखांमधील वाढत्या अनियमिततेविरोधात अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी स्पष्ट केले की, ऑक्टोबर २०२४ पूर्वी निवासी भागांमध्ये केलेल्या जमिनीच्या विभाजनांना नियमित करण्याचा सरकार विचार करू शकते, परंतु त्यानंतर अधिकृत लेआउटच्या मंजुरीशिवाय भूखंडांची कोणतीही विक्री पूर्णपणे बेकायदेशीर मानली जाईल.पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बावनकुळे म्हणाले की, शहरात आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत भूखंड तयार केले जात आहे, ज्यात शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे लहान तुकड्यांमध्ये विभाजन करून त्यांची विक्री केली जात आहे. यासाठी विविध ठिकाणी कार्यालये उघडून उघडपणे व्यवसाय चालवले जात आहेत. अशा व्यवसायांवर आणि भूमाफियांवर कारवाई करण्यासाठी सरकार आता पूर्णपणे सज्ज आहे. त्यांनी इशारा दिला की, जमिनीचा कोणताही तुकडा विकण्यापूर्वी आता संबंधित नगरपालिका, महानगरपालिका किंवा सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य असेल. उल्लंघन करणाऱ्यांवर केवळ प्रशासकीय कारवाईच नाही, तर फौजदारी कारवाईही केली जाईल.

# पावसाळी अधिवेशनापूर्वी निवडणुकीची शक्यता

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्यानंतर आता विधान परिषदेच्या रिक्त जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून येणाऱ्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या जागा रिक्त असल्याने विधान परिषदेतील सदस्यसंख्येवर त्याचा परिणाम झाला होता. मात्र आता आवश्यक अटी पूर्ण झाल्यामुळे निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत न झाल्यामुळे अनेक मतदारसंघांतील विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरही निवडणुका घेता आल्या नव्हत्या. नियमानुसार, संबंधित मतदारसंघात किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असणे आवश्यक असते. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्याने ही अट पूर्ण झाली असून आता निवडणूक आयोगाकडून पुढील प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक पक्षांनी आतापासूनच रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या ७८ आहे. त्यापैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून येतात. सध्या त्यातील १७ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर निवडणुका झाल्यानंतर विधान परिषदेतील राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

# कुरण शिवारात पंधराशे किलो गोमांस जप्त

## साडे पंधरा लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात

संगमनेर (प्रतिनिधी)

कुरण शिवारात सुरू असलेल्या अवैध गोवंश कत्तलखान्यावर सोमवारी (दि.११) मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास संगमनेर शहर पोलिसांच्या पथकाने कारवाई करत सात जनावरांची कत्तलीपासून सुटका केली. तर न पंधराशे किलो गोमांस, कार, दुचाकी, वजन काटा व इतर साहित्य असा एकूण १५ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी शहर पोलिसांत तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन कुरण शिवारात सुरू असलेल्या अवैध गोवंश कत्तलखान्यावर पथकाने छापा टाकला. तेव्हा सात गोवंश जनावरे कुसल करण्याच्या उद्देशाने विर्दयतेने बांधून ठेवलेली आढळली. तसेच पंधराशे किलो गोमांस मिळाले. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागताच जादू उर्फ रेहान गुलामनबी कुरेशी, फारुक यूसुफ सय्यद (दोघे रा. अलकानगर, संगमनेर) आणि आसिफ हरुण शेख (रा. कुरण, संगमनेर) हे तिघे पसार झाले.

या कारवाईत पोलिसांनी ४ लाख ९० हजार रुपयांच्या सात गोवंश जनावरांची सुटका करत, ४ लाख ५० हजार रुपयांचे पंधराशे किलो गोमांस, ५ लाख रुपयांची कार (एमएच.०३, बीसी. ८८१७), एक लाख रुपयांची मोटारसायकल (एमएच. १७, सीवाय. ९५६५), ५ हजार रुपयांचा डिजिटल वजन काटा, तीन हजार रुपयांचे वजन करण्यासाठी असलेले लोखंडी पोल, एक हजार रुपयाचा लोखंडी हूक आणि तीन हजार रुपयांचे इतर साहित्य असा एकूण १५ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोहेकॉ. लुमा भांगरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील तिघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोहेकॉ. बिबवे हे करत आहे.

# पर्यावरणपूरक वाहतुकीकडे एसटीचा प्रवास



मुंबई (वृत्तसंस्था)

एसटी महामंडळातील सर्व बसेस २०३५ पर्यंत ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याच्या दृष्टीने राज्य शासन आणि एसटी महामंडळाकडून वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने आवश्यक असलेल्या चार्जिंग सुविधांची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यभरात किमान २०० चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असून, यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयीन दालनात आयोजित बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.मंत्री सरनाईक म्हणाले की, २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बसेस ई-बसेस करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या दृष्टीने भविष्यात सुमारे २० हजार ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारणे ही काळाची गरज आहे. राज्यभरातील एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागांवर नियोजित चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ठराविक क्षेत्र संबंधित विकासकाला देण्यात येईल. त्या ठिकाणी विकासकाकडून आधुनिक चार्जिंग स्टेशन उभारण्यात येतील, जिथे एसटीच्या ई-बसेस चार्ज केल्या जातील.

सुमारे १५०० चौरस फूट जागा संबंधित विकासकाला भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर वेळेत त्या चार्जिंग स्टेशनवर खासगी वाहनांनाही चार्जिंग सुविधा देण्यास परवानगी असेल. त्यामुळे एसटी महामंडळाला माफक दरात ई-बसेस चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल.

# केंद्राकडून घेण्यात आलेली NEET परीक्षा रद्द

मुंबई (वृत्तसंस्था) -राज्यातील १० वी आणि १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून १० वी नंतर अनेकांनी नीट परीक्षेची तयारी सुरू केली आहे. तर, १२ वीच्या परीक्षेनंतर कित्ये विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा देऊन भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र, केंद्र सरकारने नीट परीक्षेसंदर्भात मोठा निर्णय घेतला असून यंदाच्या वर्षी म्हणजेच ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली आहे. आता, ही परीक्षा नव्याने घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे शासनाने हा निर्णय घेतला असून काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही नीट परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित केला होता.

देशातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांनी यंदा ३ मे २०२६ रोजी नीटची परीक्षा दिली होती, त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास अडीच लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. मात्र, देशभरात ४२ तास अगोदरच या पेपरची प्रश्नपत्रिका बाहेर आल्याने पेपर फुटला होता. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेकडून हा परीक्षा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २८१ प्रश्न असलेल्या सीर्शीी रिंशी मधील १३१ प्रश्न जसेच्या तसे छएएढ च्या प्रश्नपत्रिकेत येत असतील तर २०२४ प्रमाणे यंदा देखील परीक्षेत पैशांचा मोठा खेळ झाला हे स्पष्ट आहे. गेल्या आठवड्यात महाराष्ट्रात देखील असाच प्रकार सीआरपीएफ परीक्षेच्या संदर्भात देखील झाला होता. ठराविक दलालांच्या पैशाच्या खेळात विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी करून त्यांच्या आयुष्याचा खेळ करणं योग्य नाही.

# ऑनलाईन औषध विक्री विरोधात २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात वाढलेली बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांच्या एकाधिकारशाहीविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक दिली. या संपात अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व केमिस्टनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर आणि सचिव आबासाहेब बेद्रे यांनी केले आहे. ड्रग अँड कॉस्मेटिक्स अ‍ॅक्ट' मध्ये ऑनलाईन विक्रीची स्पष्ट तरतूद नसतानाही राजरोसपणे ई-फार्मसीचा बाजार सुरू असून, दिल्ली उच्च न्यायालयाच्या स्थगितीकडेही सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा संघटनेचा आरोप आहे. कोरोना काळात दिलेली होम डिलिव्हरीची विशेष परवानगी अद्याप रद्द न झाल्याने कॉर्पोरेट कंपन्या भांडवलाच्या जोरावर २० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत देत आहेत. यामुळे शासनाने ठरवून दिलेल्या नफ्यावर काम करणाऱ्या देशातील १२.५० लाख छोट्या औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे.

# उमेद अभियान महिलांसाठी नव्या संधींचे व्यासपीठ - पालकमंत्री



(जिल्हा माहिती कार्यालय)

शिर्डी - विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नारीशक्तीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बचत गटांच्या चळवळीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग सातत्याने वाढत असून, बचतगट व 'उमेद' अभियानाला शासनाचे भक्कम पाठबळ आहे. येणाऱ्या काळात उमेद अभियानाचा प्लॅटफॉर्म महिलांना नव्या संधी उपलब्ध करून देणारा ठरेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

श्रीरामपूर तालुका पंचायत समिती व कृषी विभागाच्या वतीने महिला बचत गटांना अनुदान वाटप तसेच विविध साहित्याचे वितरण मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, शहरी आणि ग्रामीण भागातील बचत गटांच्या चळवळीशी जोडलेल्या महिला आता स्वतःच्या हिमतीवर यशस्वी उद्योजक बनत आहेत. या चळवळीने नारीशक्तीला संघटित करण्याचे मोठे काम केले आहे. विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारीशक्तीच्या सन्मानासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून, त्याचा सकारात्मक परिणाम बचत गटांच्या चळवळीवर दिसून येत आहे.

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून उमेद अभियानाला मोठे पाठबळ मिळत आहे. राज्य सरकारने आतापर्यंत बचत गटांच्या चळवळीला ४८ हजार कोटी रुपयांचे कर्जवाटप केले आहे. या कर्जाच्या परतफेडीची शाश्वती असल्यामुळे सरकारचा या चळवळीवर अधिक विश्वास वाढला आहे. भविष्यात बचत गटांच्या उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठेत मोठ्या स्पर्धेला सामोरे जावे लागणार आहे. उमेद अभियानाच्या माध्यमातून बचत गटांची एक हजार उत्पादने ऑनलाइन उपलब्ध करण्यात आली आहेत. वाढती स्पर्धा लक्षात घेता, उत्पादनाच्या आकर्षक पॅकेजिंगबरोबरच मार्केटिंगमध्येही व्यावसायिकता स्वीकारावी लागेल, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा स्तरावर 'उमेद मॉल' उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. लवकरच तालुकास्तरीय उमेद मॉलची संकल्पनाही प्रत्यक्षात आणली जाणार असून, तालुकास्तरीय पहिला उमेद मॉल श्रीरामपूर येथे उभारण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. 'लखपती दीदी' निर्माण करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, लाडक्या बहिणींच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे आहे. तसेच, अहिल्यानगरमध्ये एकल महिलांसाठी सुरू झालेली चळवळ अधिक व्यापक करून या महिलांनाही कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रकल्प संचालक मंजुषा ठवरकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, संजय फंड, दीपक पठारे, नानासाहेब पवार, शरदराव नवले, बाबासाहेब चिडे, जितेंद्र छाजेड, श्रीनिवास बिहाणी, गिरीधर आसणे, गटनेत्या वैशाली चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देऊळ बंद २ ची कमाई शेतकरी मुलांच्या शिक्षणासाठी - प्रवीण तरडे

युवावार्ता शिर्डी (प्रतिनिधी)

बहुप्रतीक्षित 'देऊळ बंद - २'हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, यंदा चित्रपटात प्रेक्षकांना एक वेगळाच ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. आता परीक्षा देवाची अशी दमदार टॅगलाईन असलेल्या या चित्रपटात एका महिला शेतकऱ्याची कथा मांडण्यात आली आहे. ही महिला थेट स्वामींचीच परीक्षा घेताना दिसणार असून, चित्रपटातून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसारख्या गंभीर विषयावर भाष्य करण्यात आले आहे. आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत, तर बदलत्या काळानुसार शेतीत बदल आणि अभ्यासपूर्ण निर्णय घेण्याची गरज आहे, असा ठाम संदेश या चित्रपटातून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा, संघर्ष आणि त्यांच्या आयुष्यातील वास्तव मांडणाऱ्या 'देऊळ बंद - २' चित्रपटाची संपूर्ण टीम नुकतीच शिर्डीत साईबाबांच्या चरणी नतमस्तक झाली. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी दिग्दर्शक प्रवीण तरडे यांच्यासह संपूर्ण कलाकारांनी साईंच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी प्रवीण तरडे यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे सर्वांच्याच मनात त्यांच्या विषयीचा आदर अधिक वाढला. 'देऊळ बंद - २' या चित्रपटातून होणारी कमाई शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी देण्यात येणार असल्याची घोषणा केली.













# राष्ट्रीय कार्यकारिणीतून पटेल, तटकरेंची नावे गायब ?



मुंबई (प्रतिनिधी)-

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीवरून राष्ट्रवादी अजित पवार गटात मोठा राजकीय गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेल्या कार्यकारिणीच्या यादीत प्रफुल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांचे नाव नसल्याचे अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, चर्चांना उधाण आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीची यादी सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मात्र, या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीत एक तांत्रिक चूक झाल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी एक्सवर पोस्ट करत स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक आयोगाला राष्ट्रीय कार्यकारिणी आणि त्यांचे काम यासंदर्भात सविस्तर यादी २९ एप्रिलला दिल्याचे पत्र प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल होत आहे. या पत्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या सोबत जनरल सेक्रेटरी म्हणून पार्थ पवार आणि जय पवार यांचे सुद्धा नाव आहे.

मात्र, यामध्ये प्रफुल पटेल, सुनील तटकरे या नेत्यांची नावे राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये वगळण्यात आल्याचे या यादीमध्ये दिसत आहे. परंतु, या यादीमध्ये तांत्रिक आणि क्लेरिकल चुका असून, या दुरुस्त केल्या जातील, असे सुनेत्रा पवारांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.

# शेततळ्यांमुळे तालुक्यात उन्हाळी टोमॅटो लागवडीला वेग

## जुलै-ऑगस्टमधील चांगल्या बाजारभावासाठी मे महिन्यातच लागवड



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अल्प पर्जन्यमान आणि दुष्काळी परिस्थितीसाठी ओळखल्या जाणाऱ्या संगमनेर तालुक्यातील तळेगाव परिसरात शेततळ्यांमुळे शेतीचे चित्र बदलताना दिसत आहे. पूर्वी मोसमी पावसावर अवलंबून असलेली टोमॅटो लागवड आता पावसाळ्यापूर्वीच, म्हणजे मे महिन्यात सुरू होत असून, परिसरातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उन्हाळी टोमॅटो उत्पादनाकडे वळत आहेत.

टोमॅटो उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या सोनोशी, पिंपळे, सोनेवाडी आणि निमोण या गावांमध्ये सध्या टोमॅटो लागवडीची लगबग सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेततळ्यांची निर्मिती केल्याने साठवलेल्या पाण्याचा वापर ठिबक सिंचनाद्वारे केला जात आहे. त्यामुळे पावसाची वाट न पाहता मे महिन्यातच टोमॅटो लागवड शक्य झाली आहे.

जुलै आणि ऑगस्ट महिन्यात टोमॅटोला बहुतांश वेळा चांगला बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी मे महिन्यातील लागवडीस प्राधान्य देत आहेत. कमी पाण्यात अधिक उत्पादन मिळवण्यासाठी ठिबक सिंचनासोबत मल्चिंग पेपरचाही मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. यामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होत असून, पाण्याची बचतही होत आहे.

शेतकरी सुरुवातीचे दोन महिने शेततळ्यातील पाण्यावर पीक वाढवत असून, त्यानंतर पावसाच्या पाण्यावर हे पीक घेतले जाते. कमी कालावधीत उत्पादन देणाऱ्या संकरीत वाणांकडेही शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

उन्हाळी टोमॅटो लागवड ही फायदेशीर असली, तरी ती आव्हानात्मक शेती मानली जाते. मात्र, योग्य नियोजन, पाण्याचे व्यवस्थापन आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे या भागातील शेतकरी टोमॅटो उत्पादनातून चांगला आर्थिक लाभ मिळवत असल्याचे चित्र दिसून येत आहे.


# जागृती देणारा वारकरी संप्रदाय - ह.भ.प. राऊत महाराज

## सहज बोलणे हित उपदेश । करुनी सायास शिकविती...



युवावार्ता (सदाशिव मुळे)

संगमनेर शहराच्या जनता नगरमध्ये सुरू असलेल्या ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्व प्रेरणे ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह कीर्तन महोत्सव सोहळ्यात कीर्तनरुपी पाचवे पुष्प गुंफताना बीड जिल्ह्यातील म्हाळसा जवळा येथील ह.भ. प. महादेव महाराज राऊत यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा संतांनी केलेल्या उपकाराची कृतज्ञता व्यक्त करणारा अभंग सेवेसाठी घेतला. या अभंगाचा अर्थ असा की, या संतांचे उपकार काय सांगावेत ते मला नेहमी धर्म, भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि स्वतःचे हित कशात आहे याविषयी नेहमी जागृत करून देतात. अशा प्रकारचा आगाध उपकार संतांनी माझ्यावर केला आहे आणि त्या बदल्यात काय द्यावे आणि त्यांच्या उपकारातून उतराई कसे व्हावे हे मला कळत नाही. माझा जीव जरी त्यांच्या पायावर ठेवला तरी तो देखील त्यांच्या उपकारातून उत्तीर्ण होण्यासाठी थोडाच आहे. संत सहज जरी बोलले तरी तो आपल्या हिताचा उद्देश ठरतो. आणि संत स्वतः सायास करून आपल्याला शिकवित असतात. तुकाराम महाराज म्हणतात जसे गाईच्या चित्तामध्ये तिचे वासरू असते त्याचप्रमाणे संतांच्या चित्तामध्ये सारखे मीच आहे आणि माझा सांभाळ करण्यासाठी संत देखील या गाईप्रमाणे माझ्याकडे येतात. अभंगावरील चिंतनात बोलताना ह. भ. प. महादेव महाराज राऊत म्हणाले की वारकरी संप्रदाय जागृती देणारा संप्रदाय आहे संप्रदायाचे आराध्य दैवत विठ्ठल उभ्या स्थितीत आहे संत उभे आहेत कीर्तनात कीर्तनकार विणेकरी टाळकरी उभेच असतात जो उभा असतो तो कधी झोपी जात नाही हे सर्व जागृत असतात संत कसे असतात वसंत कोणाला म्हणावे याबद्दल त्यांनी सविस्तर विवेचन केले पुढे ते म्हणाले संत हा रस देऊन दुसऱ्याला वाढतात दुसऱ्याला देणारे संत असतात संत जगाला जागृती देण्याचा महत्त्वाचे काम करतात भक्तांना साधकांना परमार्थ शिकवतात संत जगाचा उद्धार करतात ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावर शिष्याला व भक्तांना जी तृप्ती मिळते त्यापेक्षा संतांना तृप्तीचा आनंद मोठा असतो वारकरी संप्रदायाचा देव उभा आहे. निरुपाधिक व निर्विकल्प, निर्विकार व माया रहीत आहे भक्तांचा उद्धार करण्यास तत्पर आहे. सर्व जग विद्यार्थी आहे या भावनेतून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम,संत नामदेव व सर्व संतांनी समाजाला जागृती दिली. मोहमाया झोपेतून, अहंकाराच्या अंधकारातून जागे करून आत्मज्ञानाची वाट दाखविली. देह म्हणजे मी या भ्रमातून बाहेर काढले. नाम व ज्ञान दिले. संत व्यवहारात असले तरी त्यांचे लक्ष भक्तांच्या कल्याणाकडे असते. जन्म मरणाच्या फेऱ्यातून सोडविण्यासाठी संत झटतात. संत हे चालते बोलते परब्रम्ह आहेत. आपल्याला निष्काम भावनेने ज्ञान देतात. आपले रक्षण करतात त्यांची उपकाराची फेड केवळ त्यांच्या चरणी लिन होऊन आणि त्यांनी दिलेला नामाचा मार्ग पुढे चालवण्यानेच होऊ शकतो. हा अभंग कृतज्ञतेचा कळस आहे.




# भारती सावंत यांचे वृद्धापकाळाने निधन



राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील राजूर येथील राष्ट्र सेवा दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते विनय सावंत यांच्या मातोश्री भारती भरतराव सावंत (९३) यांचे सोमवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

भारती सावंत या सर्वोदयवादी आणि राष्ट्र सेवा दलाचे जुन्या जाणत्या पिढीतील दिवंगत कार्यकर्ते भरत सावंत यांच्या पत्नी, तर प्रा. बिना सावंत यांच्या सासू होत्या. त्यांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत प्रदीर्घ काळ शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचे कार्य केले. त्यांच्या निधनाने परिसरात सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

# कडक उन्हामुळे त्वचा काळवंडते, यावर उपाय पहा...

अनेकांना कडक उन्हाचा त्रास होतो. उन्हात बाहेर पडताना काही जण मॉइश्चरायझर आणि सनस्क्रीनच्या मदतीने चेहरा आणि मान झाकतात. पण हातांना सनस्क्रीन लावणे अनेकांना आवश्यक वाटत नाही. जास्त वेळ उन्हात राहिल्याचा परिणाम हातावर दिसून येतो. शरीराच्या इतर भागापेक्षा हात वेगळे दिसतात. हाताचा रंग गडद काळा होतो. घरच्या घरी काही टिप्सचा वापर करून हातावरील काळपटपणा दूर करू शकता.

कच्चे दूध : हाताचा काळेपणा दूर करण्यासाठी कच्चे दूध उपयुक्त ठरते. कच्च्या दुधात लॅक्टिक सिड असते, जे काळपट झालेल्या हातावर ब्लीचिंग एजंट म्हणून काम करते. अती सूर्यप्रकाशामुळे हात काळे झाले असतील, तर कच्चे दूध वापरू शकता. यासाठी कच्चे दूध घ्या. ते हाताला लावा आणि हलक्या हाताने चोळा. २०-२५ मिनिटांनी साधारण पाण्याने हात धुवा. कच्चे दूध त्वचेला एक्सफोलिएट करते. यामुळे हातातील मृत त्वचेच्या पेशी निघून जातात. त्वचा कोरडी, खडबडीत आणि निर्जीव असेल, तरीही फायदा जाणवेल.

बेसन : सूर्यप्रकाशामुळे हातावर काळेपणा जमा झाला असेल, तर बेसनाचा वापर करावा. बेसनामुळे त्वचेची टॅनिंग दूर होते. यासाठी २ चमचे बेसन घ्या. त्यात गुलाबपाणी मिसळा. आता याने हात स्क्रब करा. अर्ध्या तासानंतर हात पाण्यात भिजवा. बेसनामुळे हातांचा रंग सुधारतो नि त्वचेवर चमक येते.

कोरफड : हाताचा काळेपणा दूर करण्यासाठी कोरफडीचा वापर केला जाऊ शकतो. हातावर कोरफडीचे जेल लावा. अर्ध्या तासानंतर हात स्वच्छ करा. सूर्यप्रकाशामुळे जळलेली त्वचा बरी करायची असेल, तर काकडीचाही वापर



करू शकता. यामुळे जळजळ आणि खाज कमी होते. यासोबतच काळेपणाही दूर होतो. यात थोडा लिंबाचा रस टाकल्यास फायदा जाणवू शकतो.

बटाट्याचा रस : हातावरील काळेपणा दूर करण्यासाठी बटाट्याचा रस वापरू शकता. बटाट्याच्या रसात कॅटेकोलेज नावाचे एन्झाइम असते. यामुळे काळपट झालेला त्वचेचा रंग सुधारतो. त्वचेवरील काळे डाग आणि टॅनिंग निघून जाईल. बटाट्याचे काप करा. याने हात चोळा. काही वेळाने हात धुवा. यानंतर चांगला परिणाम दिसून येतो.

दही : हाताचा काळेपणा दूर करण्यासाठी दह्याचा वापर करू शकता. यासाठी एक वाटी दही घ्या, त्यात चिमूटभर हळद घाला. आता ते हातावर लावा. २०-३० मिनिटांनी स्वच्छ पाण्याने हात धुवा. यामुळे हातांचा काळेपणा दूर होऊन त्वचेचा रंग उजळतो. दही त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि त्वचा टोन्ड बनवते.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकजण त्वचेची योग्य काळजी घेण्याकडे दुर्लक्ष करतात. विशेषतः उन्हाळ्यात कडक सूर्यप्रकाशामुळे त्वचेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्वचा काळवंडणे, कोरडी पडणे, खाज येणे आणि त्वचेवर डाग निर्माण होणे अशा समस्या वाढू लागतात. त्यामुळे केवळ चेहऱ्याचीच नव्हे, तर हात, मान आणि शरीराच्या इतर उघड्या भागांची देखील योग्य काळजी घेणे आवश्यक ठरते. बाहेर पडताना शक्यतो पूर्ण बाह्यांचे कपडे वापरणे, हातमोजे घालणे तसेच भरपूर पाणी पिणे यामुळे त्वचेचे संरक्षण होण्यास मदत होते. यासोबतच बाजारातील रासायनिक उत्पादनांचा अतिरेक टाळून घरगुती आणि नैसर्गिक उपायांचा वापर केल्यास त्वचा अधिक सुरक्षित आणि निरोगी राहू शकते.

त्वचेचा काळेपणा दूर करण्यासाठी सातत्य महत्त्वाचे असते. कोणताही घरगुती उपाय एक-दोन वेळा वापरून लगेच परिणाम मिळत नाहीत. नियमित काळजी, संतुलित आहार आणि योग्य जीवनशैली यामुळे त्वचा नैसर्गिकरित्या निरोगी आणि उजळ राहण्यास मदत होते. फळे, भाज्या आणि जीवनसत्त्वयुक्त आहार त्वचेला आतून पोषण देतो. तसेच पुरेशी झोप आणि ताणतणावापासून दूर राहणेही त्वचेसाठी लाभदायक ठरते. त्वचेच्या समस्या अधिक वाढत असल्यास त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासद व कर्मचारी स्नेहमेळावा उत्साहात




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

दिनांक ०९/०५/२०२६ रोजी या संस्थेच्या नवीन प्रशस्त इमारतीचे वास्तुपूजन व स्नेहमेळावा लोकनेते बाळासाहेब थोरात साहेब, मा. डॉ. सुधीर तांबे व मा. आ. सत्यजीत तांबे यांच्या उपस्थितीत पार पडला. सहकारमहर्षी भाऊसाहेब दादा थोरात यांनी संगमनेर तालुक्यात सहकाराची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व मा. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनामुळे संगमनेरचे नाव केवळ राज्यातच नव्हे, तर देशपातळीवरही उजळले.

संस्थेचे संचालक विलास दिघे व शुभदा दिघे यांच्या हस्ते वास्तु होमपूजन करण्यात आले व सायंकाळी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते बांधकाम वास्तुविशारद, बांधकाम ठेकेदार, कामगार, सप्लायर्स यांचा सत्कार करण्यात आला. माजी मंत्री थोरात म्हणाले की, संग्राम पतसंस्थेने बांधकाम करणाऱ्या कामगारांचा मान-सन्मान जपला आहे. हा एक स्तुत्य उपक्रम संस्थेने केला आहे. भव्य इमारत बांधून संग्राम पतसंस्थेने संगमनेरच्या वैभवात मोठी भर घातली आहे. डॉ. सुधीर तांबे यांनी लावलेल्या रोपाचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

डॉ. सुधीर तांबे यांनी सन १९८८ साली संग्राम नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली. स्नेहमेळावा प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. सुधीर तांबे यांनी माजी संचालकांचे संस्थेच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे, हे आवर्जून सांगितले. आज गेली ३८ वर्षे ही संस्था शेतकरी, कामगार, छोटे-मोठे व्यापारी आणि नागरिकांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत आहे. पारदर्शक व नियोजनबद्ध व्यवस्थापनाच्या बळावर संस्थेने संपूर्ण जिल्ह्यात उल्लेखनीय विस्तार साधला आहे.

संगमनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी संस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे ज्येष्ठ संचालक डॉ. एन. एस. शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, गेले ३८ वर्षांच्या कालावधीत संस्थेने अनेक अडचणींना मात करत कशी प्रगती केली, याविषयी माहिती दिली. संस्थेचे चेअरमन राणीप्रसाद मुंदडा यांनी प्रास्ताविकात पतसंस्थेच्या स्थापनेपासूनचा प्रवास, सभासदांचा विश्वास आणि नवीन इमारतीमुळे ग्राहकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. संस्थेचे व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले व कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण सोहळा आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# संपादकीय...

## मोबाईल व्यसनामुळे विद्यार्थी जीवन होते उध्वस्त

आजच्या आधुनिक युगात मोबाईल फोन हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संवाद, शिक्षण, मनोरंजन, माहिती आणि व्यवहार यासाठी मोबाईलचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असला, तरी त्याचे वाढते व्यसन विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर गंभीर परिणाम घडवू लागले आहेत. काही वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके, वही, मैदानी खेळ किंवा वाचन दिसत होते, परंतु आता त्याच जागी मोबाईलने स्थान घेतले आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक विद्यार्थी सतत मोबाईलमध्ये गुंतलेले दिसतात. शैक्षणिक उपयोगाच्या नावाखाली सुरू झालेला मोबाईलचा वापर आता मनोरंजन, सामाजिक माध्यमे, ऑनलाईन खेळ आणि सततच्या आभासी जगात रमण्यापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक, शारीरिक आणि सामाजिक जीवन झपाट्याने बदलत चालले आहे. मोबाईलमुळे ज्ञानाचे अनेक दरवाजे खुले झाले, जगभरातील माहिती काही क्षणांत उपलब्ध होऊ लागली, शिक्षणाच्या नवीन संधी निर्माण झाल्या, परंतु त्याच वेळी नियंत्रणाशिवाय होणारा वापर विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी धोकादायक ठरत आहे. अनेक विद्यार्थी अभ्यासापेक्षा मोबाईलमध्ये अधिक वेळ घालवतात. अभ्यास करताना सतत येणारे संदेश, चित्रफिती आणि मनोरंजनामुळे त्यांचे लक्ष विचलित होते. परिणामी अभ्यासात एकाग्रता राहत नाही, स्मरणशक्ती कमी होते आणि शैक्षणिक गुणवत्ता घसरू लागते. अनेक पालक सांगतात की, मुलांना पुस्तक वाचण्यापेक्षा मोबाईल पाहणे अधिक आवडते. यामुळे वाचनसंस्कृती कमी होत आहे आणि विचारशक्तीवरही परिणाम होत आहे. मोबाईल व्यसनामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्यावरही मोठा परिणाम दिसून येतो. सतत पडद्याकडे पाहिल्यामुळे डोळ्यांचे विकार, डोकेदुखी, मानदुखी, झोपेच्या समस्या आणि लठ्ठपणा वाढताना दिसत आहे. पूर्वी मुले मैदानी खेळ खेळत असल्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहत होते, परंतु आता बहुतेक विद्यार्थी घरात बसून मोबाईलवर वेळ घालवत असल्याने शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. त्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होण्याची भीती निर्माण झाली आहे. मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम अधिक गंभीर आहेत. सतत सामाजिक माध्यमांवर राहिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिडचिड, एकटेपणा, नैराश्य आणि तणाव वाढत आहे. इतरांचे आभासी आयुष्य पाहून स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. काही विद्यार्थी अभ्यासापासून दूर जाऊन दिवसभर खेळ, चित्रफिती किंवा निरर्थक संदेशांमध्ये रमून जातात. यामुळे वेळेचे नियोजन बिघडते आणि जीवनातील उद्दिष्टांपासून ते दूर जाऊ लागतात. मोबाईलमुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक जीवनातही मोठे बदल झाले आहेत. पूर्वी मित्रमैत्रिणींसोबत प्रत्यक्ष संवाद होत असे, खेळातून मैत्री वाढत असे, कुटुंबासोबत वेळ घालवला जात असे, परंतु आता प्रत्येकजण मोबाईलमध्ये व्यस्त असल्याने प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. घरात एकत्र बसूनही प्रत्येकजण वेगळ्या आभासी जगात रमलेला दिसतो. त्यामुळे नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होऊ लागला आहे. मोबाईलचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांवरही परिणाम करत आहे. चुकीची माहिती, अश्लीलता, हिंसक दृश्ये आणि चुकीच्या प्रवृत्तींचा प्रभाव अनेक विद्यार्थ्यांवर पडत आहे. काही वेळा मोबाईलमुळे गुन्हेगारी प्रवृत्ती, फसवणूक आणि आभासी व्यसनांच्या जाळ्यात विद्यार्थी अडकताना दिसतात. त्यामुळे पालक आणि शिक्षकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. मोबाईल पूर्णपणे बंद करणे हा उपाय नाही, कारण आजच्या युगात तंत्रज्ञान आवश्यक आहे. मात्र त्याचा योग्य आणि मर्यादित वापर होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर शिक्षण, ज्ञान आणि सकारात्मक कामांसाठी करायला हवा. पालकांनी मुलांशी संवाद वाढवून त्यांना मोबाईलच्या दुष्परिणामांची जाणीव करून द्यावी. घरात मोबाईल वापरासाठी वेळेची मर्यादा ठरवावी. विद्यार्थ्यांना वाचन, खेळ, संगीत, कला आणि सामाजिक उपक्रमांकडे वळवणे आवश्यक आहे. शाळांनीही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून मोबाईल व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. समाजानेही या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कारण आजचे विद्यार्थी हे उद्याचे भविष्य आहेत. त्यांचे जीवन जर मोबाईलच्या आहारी गेले, तर देशाच्या प्रगतीवर त्याचा परिणाम होणार आहे.

# जयहिंदच्या शिबिरातून घडतेय विज्ञाननिष्ठ पिढी - मा. आ. तांबे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

निरोगी आणि सुदृढ समाजनिर्मितीसाठी कार्यरत असलेल्या 'जयहिंद लोकचळवळ'च्या माध्यमातून अमृतवाहिनी मॉडेल स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेले पाचदिवसीय निवासी युवा सर्वांगीण विकास शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात ११ ते १६ वयोगटातील १०० विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमातून विज्ञाननिष्ठ विचारांची सुदृढ पिढी घडवली जाईल, असा विश्वास संस्थेचे संस्थापक मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केला.



अमृतवाहिनी मॉडेल स्कूल येथे जयहिंद लोकचळवळीच्या वतीने आयोजित शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, देश विकसित करायचा असेल तर युवकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असून, समाजातील आर्थिक विषमता कमी झाली तरच देश खऱ्या अर्थाने प्रगत होईल, असे त्यांनी नमूद केले.

शिबिरात विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात योगा, एरोबिक्स आणि व्यायामाचे प्रकार घेण्यात आले, तर सायंकाळी मैदानी खेळ, पथनाट्य, नाटक, अभिनय, नृत्य, गीतगायन आणि झांज अशा सांस्कृतिक उपक्रमांनी विद्यार्थ्यांना आनंददायी अनुभव दिला. बौद्धिक सत्रात प्रा. बाबा खरात यांनी पर्यावरणाचे महत्त्व, शिवाजी नाईकवाडी यांनी मानवी मूल्ये, तर हिरालाल पगडाल यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांवरील समज-गैरसमज यावर मार्गदर्शन केले. स्वप्निल मानव यांनी आजचा युवक या विषयावर संवाद साधला. अमृतवाहिनी मॉडेल स्कूलचे प्राचार्य आशिष कुमार यांनी करिअर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मातीकाम, पेंटिंग, कागदकाम, ओरिगामी आणि हॉर्स रायडिंगसारखे उपक्रम घेण्यात आले. यासाठी प्राचार्य आशिष कुमार आणि शोभा हजारे मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अनंत शिंदे, बजरंग जेडगुले आणि हर्षल थेटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिबिरात वैभवी प्रेमलता संजय आढाव, प्रा. कोमल मस्के, धनश्री टाकळकर, दिपाली गायके, समाधान जाधव, तेजस पवार यांसह अनेक प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. सहासी खेळ, योगा, छायाचित्रण, रायफल शूटिंग, स्काऊट गाईड, प्रथमोपचार, ट्रेकिंग, संगीत, संस्कार आणि अभिनय यांसारख्या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

समारोपप्रसंगी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे अनुभव जाणून घेतले. विद्यार्थ्यांनी पुढील शिबिराचा कालावधी वाढविण्याची मागणी केली. यावेळी डॉ. तांबे यांनी सुट्टीच्या काळात पुन्हा शिबिर आयोजित करण्याचे आश्वासन दिले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या गावात वाचन चळवळ सुरू करावी, त्यासाठी आवश्यक पुस्तके जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जातील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी पालक, विद्यार्थी तसेच जयहिंद लोकचळवळीचे राजेंद्र जोरावर आणि विलास दिघे उपस्थित होते.

# डिजिटल क्लासरूममुळे शारदा विद्यालयाच्या यशाला नवी झळाळी, दहावीचा निकाल शंभर टक्के

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथील ज्ञानगंगा विद्या प्रसारक संस्थेच्या शारदा विद्यालयाने मार्च २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल यावर्षीही १०० टक्के लागला असून, १९ वर्षांची परंपरा शारदा विद्यालयाने कायम राखली आहे.

शारदा विद्यालयातील श्रद्धा बाळासाहेब बोराडे या विद्यार्थिनीने ८८.६० % गुण मिळवून येण्याचा बहुमान पटकावला आहे. तर दुसरा क्रमांक ज्ञानेश्वरी बाळासाहेब घुले आणि प्रतीक दिलीप बोराडे यांनी ८३.२०% गुण मिळवले. तर तृतीय क्रमांक पियुष दत्तात्रेय वाकचौरे यांनी ८२.४०% गुण मिळवले आहेत. तर चतुर्थ क्रमांक प्रवीण सुदाम बोराडे याने ८०.४०% टक्के गुण मिळविले आहेत.

शारदा विद्यालयाच्या यशामागे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, सर्व संचालक मंडळ, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचा, तसेच अनुभवी शिक्षक वृंद यांना कायम सहकार्य राहिले आहे. डिजिटल क्लासरूमचा वाटा या यशामध्ये मोठा आहे.

शाळेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, मोफत पाठ्यपुस्तके आणि विविध शासकीय योजनांचा लाभही दिला जातो. अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही शाळेने आपली नवी ओळख निर्माण केली आहे. शारदा विद्यालयातील सर्व शिक्षकांचे ज्ञानगंगा विद्या प्रसारक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## चुका तुमच्या...

पान नं. ०१ वरुन

राज ठाकरे म्हणाले की, सध्या खनिज तेलाचा आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव हा साधारणपणे ९० ते १०० डॉलर्स प्रति बॅरल असा आहे. हा भाव जगाने या आधी कधी पाहिला नाही असं नाही. २००८ ला पुढे २०११-२०१२ मध्ये अरब स्प्रिंगच्या वेळेस, २०१३-२०१४ च्या काळात (जेंव्हा भाजपवाले खनिज तेलाच्या किंमती आणि देशाची इभ्रत यावर तावातावाने बोलत होते तो काळ), पुढे अशीच परिस्थिती २०२२ आणि २०२३ च्या दरम्यान जेंव्हा ओपेकने खनिज तेलाचं उत्पादन कमी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा देखील बॅरलचा भाव ९० ते १०० डॉलर्सच्या दरम्यान गेला होता. या घटनांपैकी ३ ते ४ वेळा मनमोहन सिंग पंतप्रधान होते आणि एकदा तर स्वतः मोदी पंतप्रधान होते. मनमोहन सिंगांनी असं आवाहन केलं नाही की तेंव्हा मोदींनी केलं नाही. मग आत्ताच का ? काटकसर करा हे आवाहन करताना खरं कारण देशाच्या आणि राज्याराज्यांच्या अर्थव्यवस्थेचं जे काही कंबरडं मोडून ठेवलं आहे त्याबद्दल पंतप्रधान काहीच बोलत नाहीयेत. बरं जेंव्हा बॅरलचा भाव ६० ते ६५ डॉलर्सच्या आसपास होता तेंव्हा पण तुम्ही चढ्या भावाने आम्हाला पेट्रोल डिझेल विकत होतात त्यावेळेस जे पैसे लोकांकडून घेतले जे काही लाख कोटी रुपये असतील ते कुठे गेले ?

राज ठाकरे म्हणाले की, ज्या रेवडी संस्कृतीची पंतप्रधानांनी खिल्ली उडवली त्याच रेवड्या मग २०२४ ची महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक असो की त्यानंतरच्या बिहार, पश्चिम बंगाल निवडणूका असोत की इतर कुठल्याही निवडणुका 'रेवड्या' वाटूनच निवडणुका जिंकल्यात. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेने राज्याची अर्थव्यवस्था मोडकळीला आणली. महिलांना सक्षम करायचं सोडून त्यांना तुटपुंजे पैसे द्यायचे आणि ते पैसे महागाईच्या रूपाने पुन्हा काढून घ्यायचे. देशाची आणि राज्याची अर्थव्यवस्था जर नाजूक झाली आहे तर या रेवड्या वाटू नका असं पंतप्रधान ठामपणे सांगणार आहेत का ? पेट्रोल, डिझेलच्या वापरात काटकसर करा असं पंतप्रधान सांगतात. ठीक आहे. मग हे आत्ताच का सुचलं ? पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि इतर राज्यांच्या निवडणुकीत प्रचार, रोड शो करताना आणि देशभरातून लाखो माणसं त्या त्या राज्यात नेताना जे कोट्यवधी लिटर्स पेट्रोल, डिझेल वाया गेलं तेंव्हा का नाही सुचलं ? या राज्यांमध्ये जो अफाट पैशाचा खेळ करून मतदान मिळवलं तेंव्हा का नाही सुचलं ? लोकांनी परदेशात जाणं टाळावं असं पंतप्रधान म्हणतात. पण किती टक्के लोकांना परदेशात जाणं आत्ता परवडत आहे ? स्वतः पंतप्रधान आता १५ मे पासून ५ देशांच्या परदेश दौऱ्यावर निघालेत, हे दौरे तुम्ही थांबवा. आणि मग लोकांना आवाहन करा. लालबहादूर शास्त्रीजींनी पाकिस्तान युद्धाच्या वेळेस असंच आवाहन केलं होतं पण त्यात त्यांनी स्वतः ते कृतीत उतरवलं होतं. अशी कृती स्वतः पंतप्रधान करतील का आणि त्यांच्या पक्षाच्या लोकांकडून करून घेतील का ? हे केलंत तर देश पण करेल. आणि तसाही पर्याय काय आहे ? येत्या काळात सरकारला पेट्रोल डिझेलचे भाव दणदणीत वाढवायचे असणार त्याची पूर्वतयारी सुरु आहे. हे भाव वाढले की लोकं आपोआप न परवडल्यामुळे वापर कमी करणार आहेत. राज ठाकरे म्हणाले की, माझी पंतप्रधानांना विनंती आहे की नैतिक आवाहन आणि त्याचा भार लोकांनी सहन करायचा हे सगळं बास झालं. एकदा मान्य करूया की अर्थव्यवस्था वरून सुदृढ आणि आतून कमकुवत झाली आहे आणि यांचं नुसतं खापर इराण - इस्त्रायल युद्धावर टाकू नका ! आपण पंतप्रधान झाल्या पासून रूपयाचं अवमूल्यन मोठ्या प्रमाणात झालं, हे कशामूळे झालं ते सांगा ! तुमच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात रिझर्व्ह बँकेच्या तीन गव्हर्नर्सनी राजीनामे दिले ते का दिले ? मनमोहन सिंह हे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते तसेच विद्वान होते तरीही ते अनेक तज्ज्ञांबरोबर बसून चर्चा करायचे, ऐकून घ्यायचे . आपण तर साधा व्यवसाय सुद्धा केलेला नाहीत तर आपल्याला हे कसं समजणार ? तुमच्या अनेक भूमिकांना आमचा विरोध होता आणि आहे. तसेच तुमच्या चांगल्या केलेल्या कामांचेही समर्थन केलेलं आहे परंतू आजच्या परिस्थितीत आमच्यासकट कोणीही तुमचे विरोधक नाही अथवा शत्रू नाही. असला आक्रस्ताळेपणा आमच्यात नाही. पण म्हणून प्रश्न विचारायचे नाहीत असं होणार नाही. ते आम्ही विचारणार. तेंव्हा पंतप्रधानांनी स्वतःच्या पक्षापासून काटकसर सुरु करावी आणि हे सगळं कसं निस्तरणार हे देशाला सांगावं !


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता




पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
HALIMA BANO VAJIR TAMBOLI
TO NEW NAME AS
HALIMA NASIR TAMBOLI
UIDAI 680123120290
ADRESS - A/P RAJUR , TAL - AKOLE, DIST - AHILYANAGAR, 422604

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAIKH SAEED JAMALUDDIN
TO NEW NAME AS
SAEED JAMALUDDIN KHATIB
R/O. PUNA NAKA JAVAL, NAIKWADPURA, SANGAMNER, DIST - AHILYANAGAR - 422605

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर
ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ मृत्यू नोंद/ ४४३ /२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक – २३/०३/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. तबाजी भगवंता खेमनर, रा. पिंपळगाव देपा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. पिंपळगाव देपा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे आई नामे जाईबाई भगवंता खेमनर यांचा मृत्यू मौजे पिंपळगाव देपा ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २०/०५/२०२० रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव देपा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव देपा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

त्वरित पाहिजेत
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
NAMITA CHETANBHAI PATEL
TO NEW NAME AS
NAMITA CHETAN PATEL
BOTH NAMES ARE MINE AND NOT DIFFERENT PERSON.
AT POST:KOPARGAON, TAL- KOPARGAON, DIST.- AHILYANAGAR.
AFFIDE.NO.- 26522 42031 268100 609620
DATE- 04/05/2026

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

पाहिजेत
पसायदान चिल्ड्रन क्लिनिक अ‍ॅण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर
डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)
नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)
९९६०६१०६२३

ड्रायव्हर पाहिजे
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

गाळे भाडेतत्वावर देणे आहे
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

त्वरित पाहिजेत
ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
9421911671

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६








दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# महिलांच्या आरोग्याची काळजी काळाची गरज - डॉ. श्रुतिका कांबळे

आई ही कुटुंबाचा आधारस्तंभ असते. त्यामुळे प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. निरोगी स्त्री ही केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबासाठी ऊर्जा आणि आधार देणारी असते. त्यामुळे महिलांनी आपल्या दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयी अंगीकारणे गरजेचे आहे.

संतुलित आहार घेणे हे उत्तम आरोग्याचे मुख्य सूत्र आहे. हिरव्या भाज्या, फळे, दूध, डाळी व पौष्टिक पदार्थांचा आहारात समावेश करावा. शरीर निरोगी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक असून, चालणे, योगा किंवा हलका व्यायाम आरोग्यासाठी फायदेशीर ठरतो. तसेच शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी दिवसातून पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे.

महिलांनी वैयक्तिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. विशेषतः मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेची योग्य काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. वेळेवर झोप घेणेही मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी महत्त्वाचे असून, पुरेशी झोप शरीराला ऊर्जा देते. ताणतणाव कमी ठेवण्यासाठी ध्यान, योग तसेच आवडीच्या गोष्टींमध्ये वेळ घालवावा.

नियमित आरोग्य तपासणी करणे देखील तितकेच आवश्यक आहे. रक्तदाब, हिमोग्लोबिन, मधुमेह इत्यादी तपासण्या वेळोवेळी करून घ्याव्यात. मासिक पाळी अनियमित असल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गर्भधारणा व प्रसूती काळात योग्य आहार, विश्रांती व वैद्यकीय मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

महिलांनी काही आवश्यक तपासण्या नियमित करून घेणे गरजेचे आहे. रक्त तपासणीमध्ये लिपिड प्रोफाइल, हिमोग्लोबिन, व्हिटॅमिन डी ३ आणि कॅल्शियम तपासणी करावी. तसेच पॅप स्मिअर तपासणी, स्तन कर्करोग तपासणी (ब्रेस्ट कॅन्सर स्क्रीनिंग), ईसीजी तपासणी, रक्तदाब (बीपी), साखर व थायरॉईड तपासणी वेळोवेळी करून घेणे आवश्यक आहे.

थकवा, छातीत दुखणे (चेस्ट पेन), चिडचिड, अशक्तपणा, वारंवार डोकेदुखी, पांढरा स्राव आणि पाठदुखी ही लक्षणे दुर्लक्षित करू नयेत. अशा समस्या जाणवल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



**डॉ. श्रुतिका कांबळे**
जनरल मेडिसिन
मेडिकव्हर हॉस्पिटल

# पठार भागातील तहानलेल्या वाड्या-वस्त्यांना १३ टँकरद्वारे पाणीपुरवठा; जलजीवन योजनांची कामे रेंगाळली

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील बहुतांश गावांत पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टँकरच्या मागणीत वाढ झाली असून, सध्या तालुक्यातील १८ गावे व ३४ वाड्यांमधील नागरिकांना १३ टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे.

संगमनेर तालुक्यातील डोळासणे, पिंपळगाव देपा, खंडेरायवाडी, साकूर, चौधरवाडी, कुंभारवाडी, वरवंडी, कर्जुले पठार, गुंजाळवाडी पठार, माळेगाव पठार, दरेवाडी, पोखरी बाळेश्वर, खरशिंदे, खांबे, नान्नज दुमाला, पारेगाव खुर्द, कवठे मलकापूर व काकडवाडी या १८ गावांसह गावांतर्गतच्या ३४ वाड्या-वस्त्यांवरील २६ हजार ३७ लोकसंख्येला पंचायत समितीमार्फत पाणीपुरवठा करण्यात येत आहे. संगमनेर



तालुक्यातील पठार भागात गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. बेसुमार पाणी उपसा व भविष्यातील पाणीटंचाईला तोंड देण्यासाठी करावयाच्या ठोस उपाययोजनांचा अभाव आहे. यामुळे दरवर्षीच्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू ठेवण्याची नामुष्की प्रशासनावर येत आहे.

भूगर्भातील पाणी पातळी खोलवर गेल्याने स्थानिक पातळीवरील पाणीपुरवठा योजनांना उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच घरघर लागते. त्यामुळे मानवासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागते. या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर प्रशासन व लोकप्रतिनिधींना अपयश आल्याचे दिसते. या भागातील काही गावांसाठी अनेक वर्षांपासून सुरू असलेले टँकर थांबवण्याच्या दृष्टीने राबवण्यात आलेल्या जलजीवन योजनांची कामेही स्थानिक राजकारणासह अनेक कारणांनी प्रलंबित असून, अनेक दिवसांपासून सुरूच आहेत.

संगमनेरच्या पठार भागात पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले असून, २६ हजारांहून अधिक लोकसंख्येची तहान भागवण्यासाठी प्रशासनाला १३ टँकरची मदत घ्यावी लागत आहे. जलजीवन मिशनसारख्या कोट्यवधींच्या योजना अपूर्ण राहिल्याने दरवर्षी शासनावर टँकरच्या खर्चाचा मोठा बोजा पडत आहे. पिण्याच्या पाण्यासोबतच चाऱ्याची टंचाई जाणवू लागल्याने पशुपालक आणि महिलांची मोठी पायपीट होत आहे.


या अपूर्णावस्थेतील कामांमुळे पाणीटंचाईचा राक्षस दरवर्षी भेडसावत आहे. टंचाई जाणवताच स्थानिक ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार पंचायत समितीचा टंचाई विभाग ॲक्शन मोडवर येऊन पाण्याचे टँकर सुरू होतात. कोट्यवधी रुपये खर्चाच्या जलजीवन योजना पूर्ण न होऊ शकल्याने दरवर्षी टँकरसाठी होणारा इंधनाचा व इतर खर्चाचा बोजा शासनावर पडत आहे. ही योजना केवळ ठेकेदार व ठराविक अधिकाऱ्यांनाच लाभदायक ठरत असल्याची चर्चा होत आहे. पिण्याच्या शुद्ध पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याची भीषण टंचाई जाणवू लागली असून, पाळीव जनावरांच्या चारा-पाण्यासाठी पशुपालकांची, तसेच महिलावर्गाची पायपीट सुरू आहे.

# गुंजाळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे भक्तिमय आयोजन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
प्रवरा परिसरातील धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेला उजाळा देणारा अखंड हरिनाम सप्ताह सोहळा २०२६ हा भव्य भक्तिमय सोहळा गुंजाळवाडी येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. विश्व गौरव विभूषित प. पू. स्वामी श्री चैतन्य गगनगिरी महाराज कृपेने, तसेच सर्व प. पू. स्वामी श्री गगनगिरी महाराज भक्त परिवार आणि गुंजाळवाडी ग्रामस्थांच्या सहकार्याने सोमवार दि. ८ जून २०२६ ते सोमवार दि. १५ जून २०२६ या कालावधीत हा सोहळा संपन्न होणार असून, परिसरातील हजारो भाविकांसाठी ही एक अद्वितीय आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे. या सप्ताहात दररोज पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, होमहवन, यज्ञ विधी, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, रामायण कथा, कीर्तनसेवा आणि व्याख्यानांच्या माध्यमातून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. सकाळी होमहवन व यज्ञ विधी, त्यानंतर ज्ञानेश्वरी पारायण आणि रात्री रामायण कथा, अशा विविध कार्यक्रमांमुळे वातावरणात अध्यात्म, संस्कार आणि भक्तीचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

विशेष म्हणजे, या सप्ताहात राज्यभरातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार आणि व्याख्याते उपस्थित राहून आपल्या वाणीने भक्तांना अध्यात्म, समाजप्रबोधन आणि संस्कारांचा संदेश देणार आहेत. ह. भ. प. रामराव महाराज ढोक यांची रामायण कथा हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार असून, त्यांच्या प्रभावी वाणीमुळे भाविक मंत्रमुग्ध होणार आहेत. तसेच ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे काल्याचे कीर्तन भक्तांसाठी विशेष पर्वणी मानले जात आहे. त्यांच्या विनोदी शैलीतून होणारे समाजप्रबोधन आणि अध्यात्मिक संदेश यामुळे भाविकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

कीर्तनसेवेसाठी ह. भ. प. समाधान महाराज शरण, विवेकरत्न रामायणाचार्य ह. भ. प. संजय महाराज पाचपोरे, ह. भ. प. जयवंत महाराज पाटील (रामनगरी), ह. भ. प. विशाल महाराज खोले, ह. भ. प. सोपान महाराज सानप, तसेच ह. भ. प. उत्तम महाराज मंडलिक यांसारखे मान्यवर कीर्तनकार उपस्थित राहणार असून, त्यांच्या ओजस्वी आणि संस्कारमय कीर्तनातून भक्ती, नैतिकता आणि सामाजिक मूल्यांचा संदेश दिला जाणार आहे. यासोबतच व्याख्यानसेवेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी सहभागी होत आहेत. नंदकुमारजी पवार, इंद्रजित देशमुख, डॉ. श्री. संजय मालपाणी, भास्करराव पेरे पाटील, तसेच ह. भ. प. सौ. शालिनीताई देशमुख इंदोरीकर हे आपल्या विचारांमधून अध्यात्म, समाजकारण, शिक्षण, संस्कार आणि ग्रामीण विकास या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे हा सप्ताह केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता समाजप्रबोधनाचे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे.



गुंजाळवाडी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सोहळ्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले असून, गावोगावातून भाविकांची उपस्थिती वाढत आहे. नामस्मरण, हरिपाठ आणि कीर्तनाच्या गजरात अध्यात्म, संस्कार आणि समाजएकतेचा संदेश देणारा हा सप्ताह भाविकांसाठी अविस्मरणीय ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. तरी सर्व भाविक भक्तांनी तन-मन-धन आणि पंचारूपाने सहकार्य करून या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समिती आणि भक्त परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांच्या तडजोडीसाठी 'समाधान समारोह' विशेष लोक अदालत

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-
न्यायप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून न्याय आपल्या दारी ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयामार्फत 'समाधान समारोह' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा प्रारंभ दि. २१ एप्रिल २०२६ पासून झाला असून, दि. २१, २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष लोकअदालतीत या उपक्रमाचा समारोप होणार आहे.

जिल्ह्यातील सर्व वकील, पक्षकार तसेच संबंधित हितधारकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून वादांचे प्रभावी निवारण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, शिवाजी कचरे आणि जिल्हा विधी सेवा




प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी केले आहे. या विशेष लोकअदालतीमध्ये पक्षकारांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबरोबरच आभासी पद्धतीने (ऑनलाईन) सहभागी होण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा संमती-आधारित प्रक्रियेद्वारे सलोख्याने व जलद निपटारा करणे, हा या विशेष लोकअदालतीचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून पक्षकारांना दीर्घकालीन न्यायप्रक्रियेतून दिलासा मिळून परस्पर सहमतीने वाद मिटविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली जिल्ह्यातील एकूण २४ प्रकरणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर येथे आयोजित विशेष लोकअदालतीमध्ये तडजोडीने मिटविण्यासाठी ठेवण्यात आली आहेत. तसेच, ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत आणि ज्यांना ती परस्पर संमतीने मिटविण्याची इच्छा आहे, अशी प्रकरणे देखील विशेष लोकअदालतीमध्ये ठेवता येणार आहेत.

याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर तसेच तालुका विधी सेवा समिती संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, नेवासा, श्रीगोंदा, राहाता, राहुरी, पाथर्डी, शेवगाव, पारनेर, कर्जत, जामखेड आणि अकोले येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा ८५९१९०३६१६ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा dlsanagargmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# धर्मनाद प्रतिष्ठानचा गावागावात वारकरी संस्कृती जागर उपक्रम



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर मतदारसंघात हिंदुत्व, धर्मकारण आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालत धर्मनाद प्रतिष्ठानच्या माध्यमातून एक वेगळी सामाजिक चळवळ उभी राहताना दिसत आहे. आमदार अमोलभाऊ खताळ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त व त्यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मनाद प्रतिष्ठानतर्फे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये हिंदुत्ववादी ह. भ. प. अनिल महाराज देवळेकर यांच्या प्रभावी कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले, तसेच चंदनापुरी व धांदरफळ गटातील विविध गावांतील भजनी मंडळांना पारंपरिक वारकरी साहित्य किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमानंतर उर्वरित गावांमध्ये स्वतः भेट देत धर्मनाद प्रतिष्ठानचे संस्थापक आशिष कानवडे, भागवत कानवडे, कोंडाजी कडनर, सतिष गोपाळे, पंकज जोंधळे, संकेत खुळे, मिलिंद खताळ, मिननाथ खताळ, उमेश कोकणे, संदेश देशमुख व सहकाऱ्यांनी भजनी मंडळांच्या प्रतिनिधींना साहित्य सुपूर्द केले. धर्मनाद प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरू असलेल्या धार्मिक व सामाजिक कार्याची दखल घेत धांदरफळ गटातील विविध गावांमध्ये आशिष कानवडे व त्यांच्या सहकाऱ्यांना विशेष निमंत्रित करून ग्रामस्थांकडून सन्मान करण्यात येत आहे. वारकरी संस्कृती जपण्यासाठी, तसेच युवकांना धर्म, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीशी जोडण्यासाठी सुरू असलेल्या कार्याचे ग्रामस्थांकडून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे गावागावात वारकरी संस्कृती, भजन परंपरा आणि हिंदुत्ववादी विचारांचा जागर निर्माण होत असून, युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी आशिष कानवडे म्हणाले की, आमदार अमोलभाऊ खताळ पाटील यांच्या नेतृत्वातून प्रेरणा घेत धर्मनाद प्रतिष्ठान समाजात धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकात्मतेची चळवळ उभी करत आहे. गावपातळीवर धर्म आणि संस्कार जपणारे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहेत. सदर उपक्रमाचे वारकरी संप्रदाय, भजनी मंडळे व ग्रामस्थांकडून स्वागत होत असून, धर्मनाद प्रतिष्ठानच्या कार्याची परिसरात मोठी चर्चा सुरू आहे.

# बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त व्यंगचित्र स्पर्धेचे आयोजन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त (२०२६-२०२७) संगमनेर शहर व तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने भव्य व्यंगचित्र स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेना नेते खासदार संजय राऊत, खासदार अनिल देसाई, संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, विधानसभा संपर्कप्रमुख सूर्यकांत शिंदे, जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांच्या नेतृत्वात वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शहरप्रमुख अमित चव्हाण व फैसल सय्यद यांनी दिली.

ही स्पर्धा रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत संगमनेर बसस्थानकाजवळील दत्त मंदिर येथे पार पडणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता निकाल व बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. स्पर्धेसाठी नामवंत परीक्षक लाभले असून व्यंगचित्रांच्या माध्यमातून चालू घडामोडींवर भाष्य करण्याची संधी कलाकारांना मिळणार आहे.



स्पर्धेसाठी खुला गट आणि विद्यार्थी गट असे दोन विभाग ठेवण्यात आले आहेत. खुल्या गटातील विजेत्यांना प्रथम पारितोषिक ७,०००, द्वितीय ५,००० व तृतीय ३,००० रोख रक्कम, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विद्यार्थी गटासाठी प्रथम ५,०००, द्वितीय ३,००० व तृतीय २,००० रोख पारितोषिकासह ट्रॉफी आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील विषयांमध्ये सामाजिक भान जागृत करणाऱ्या मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. खुल्या गटासाठी महागाई, राजकारणातील भ्रष्टाचार, शेतकरी समस्या, बेरोजगारी, लोकशाही व निवडणूक हे विषय देण्यात आले आहेत. तर विद्यार्थी गटासाठी मोबाईलचा अतिवापर, पर्यावरण संरक्षण, पाणी बचत, ऑनलाइन शिक्षण आणि सोशल मीडिया या विषयांवर व्यंगचित्र सादर करता येणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणीची अंतिम तारीख १४ मे २०२६ असून इच्छुकांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धकांनी पेन, पेन्सिल, रंग, पॅड व आवश्यक चित्रकला साहित्य स्वतःसोबत आणावयाचे असून आयोजकांकडून फक्त कागद उपलब्ध करून दिला जाणार आहे.

संगमनेर शहर व तालुक्यातील कलाकार, विद्यार्थी, व्यंगचित्रप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी तालुकाप्रमुख भीमाशंकर पावसे, भाऊसाहेब हासे, विधानसभा प्रमुख योगेश खेमनर, जिल्हा संघटक रविंद्र कानकाटे, दीपक साळुंके, इम्तियाज शेख, आसिफ तांबोळी, विजय सातपुते, प्रकाश गायकवाड, संभव लोढा, अमोल डुकरे, भाऊसाहेब वाराळे, महिला आघाडीच्या आशा केदारी, संगीता गायकवाड, शीतल हासे, राज्यश्री वाकचौरे, वैशाली वडतले तसेच युवा सेनेचे अक्षय गुंजाळ, सागर भागवत, गोविंद नागरे आदी परिश्रम घेत आहेत.

# भोंदू खरात प्रकरणात ईडीची एन्ट्री; रूपाली चाकणकरांच्या अडचणीत वाढ

मुंबई (प्रतिनिधी)- भोंदू अशोक खरात याचा ताबा आता अंमलबजावणी संचालनालयाकडे (ईडी) जाणार असून, त्या संदर्भातील ईडीचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. शिर्डीतील गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर एसआयटीकडून त्याचा ताबा शिर्डी पोलिसांनी घेतला होता. दरम्यान, आर्थिक फसवणुकीप्रकरणी ईडीने स्वतंत्र गुन्हा दाखल केल्याने आता खरातच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी होणार आहे. मंगळवारी खरात याचा ताबा घेण्याची कारवाई ईडीकडून होऊ शकते. दरम्यान, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनाही ईडीने चौकशीसाठी समन्स बजावल्याचे समजते.

ईडीकडून खरातच्या बँक खात्यांची, मालमत्तांची, आर्थिक देवाणघेवाणीची, तसेच विविध माध्यमांतून जमा झालेल्या पैशांच्या स्रोतांची तपासणी केली जाण्याची शक्यता आहे. त्याने लोकांकडून घेतलेली रक्कम नेमकी कुठे गुंतवली, ती कोणाच्या खात्यात वळवली गेली का, तसेच व्यवहारांमध्ये इतर सहकाऱ्यांचा सहभाग होता का, याचाही तपास केला जाऊ शकतो. याशिवाय, मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत संशयित व्यवहारांचा मागोवा घेत ईडीकडून संबंधित कागदपत्रे, मालमत्ता आणि डिजिटल पुरावे तपासले जातील.

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी

“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेरच्या सेवाभावी नेतृत्वाचा जागतिक गौरव

## लायन सुनिता मालपाणी यांची डिस्ट्रिक्ट 3234-D2 च्या उपप्रांतपालपदी दणदणीत निवड



संगमनेर (प्रतिनिधी) : लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3234-**D2** (पुणे-नाशिक-अहिल्यानगर) च्या लायनिस्टिक वर्ष २०२६-२७ साठी सेकंड व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (VDG-2) पदावर लायन सुनिता गिरीश मालपाणी यांची बिनविरोध झालेली निवड ही संगमनेरसाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब मानली जात आहे. त्यांच्या या दणदणीत आणि ऐतिहासिक निवडीमुळे लायन्स चळवळीत संगमनेरच्या नेतृत्वाचा प्रभाव अधिक ठळकपणे अधोरेखित झाला आहे. समाजसेवा, संघटन कौशल्य, प्रभावी नेतृत्व आणि संवेदनशील कार्यपद्धती यांच्या बळावर त्यांनी लायन्सच्या माध्यमातून उभारलेले कार्य आज जिल्हाभर प्रेरणादायी ठरत आहे.

लायन सुनिता मालपाणी या लायन्स क्लब इंटरनॅशनल अंतर्गत कार्यरत असलेल्या लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायर या प्रतिष्ठित क्लबच्या माजी अध्यक्षा असून, त्यांच्या नेतृत्वकाळात क्लबने अनेक नाविन्यपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सायन्स एक्स्पो, सफायर आयडॉल, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजूंसाठी अन्नधान्य वितरण, पर्यावरण संवर्धन, दिव्यांगांसाठी सहाय्य, रक्तदान शिबिरे आणि सामाजिक जनजागृती अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्यात सेवाभाव, व्यवस्थापन कौशल्य आणि समाजाप्रती असलेली प्रामाणिक बांधिलकी सातत्याने दिसून आली आहे.



लायन्स संघटनेत त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. डिस्ट्रिक्ट GAT Coordinator, GST Chairman, Region Chairperson यांसारख्या महत्त्वपूर्ण पदांवर काम करताना त्यांनी संघटनात्मक विकास, सदस्यवाढ आणि सेवा प्रकल्पांना गती दिली. त्यांच्या प्रभावी संवादशैलीमुळे आणि समन्वय क्षमतेमुळे अनेक सामाजिक उपक्रमांना व्यापक प्रतिसाद मिळाला. महिलांना नेतृत्वाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले असून, लायन्सच्या माध्यमातून समाजसेवेचे व्यापक व्यासपीठ निर्माण करण्यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.

त्यांच्या या यशामागे उद्योग, शिक्षण, आणि समाजसेवा क्षेत्रातील प्रख्यात व्यक्तिमत्व मा. गिरीशभाऊ मालपाणी यांची प्रेरणादायी साथ लाभली आहे. गिरीशभाऊ मालपाणी हे लायन्स चळवळीतील अत्यंत प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायर चे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी क्लबची भक्कम पायाभरणी केली. त्यानंतर त्यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणून उल्लेखनीय कार्य करत लायन्स चळवळीला नवी दिशा दिली. लायन्स इंटरनॅशनलचे मल्टिपल कौन्सिल चेअरमन या प्रतिष्ठेच्या पदावर अत्यंत प्रभावीपणे कार्य केले. भारतातील लायन्स चळवळीतील एक प्रभावी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. त्यांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवले गेले असून, सेवा, संघटन आणि नेतृत्व यांचा उत्कृष्ट समन्वय त्यांनी साधला आहे. मालपाणी दाम्पत्याने समाजसेवा आणि लायनिझमच्या माध्यमातून उभे केलेले कार्य आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

लायन सुनिता मालपाणी यांच्या निवडीमुळे संगमनेरच्या सामाजिक आणि सेवाभावी कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे बळ मिळाले असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली डिस्ट्रिक्ट 3234-**D2** ला नवी दिशा, अधिक प्रभावी सेवा प्रकल्प आणि सामाजिक परिवर्तनाची नवी उंची लाभेल, असा विश्वास लायन्स परिवार आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल संगमनेर शहर व तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक आणि सेवाभावी संस्थांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे. समाजसेवेच्या माध्यमातून नेतृत्वाची नवी उंची गाठणाऱ्या लायन सुनिता मालपाणी यांची ही निवड अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरणारी असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# उद्योग सुरू केले, पण व्याज परतावा थांबला

## आ. सत्यजीत तांबे




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महाराष्ट्रामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत मराठा समाजातील युवकांना स्वयंरोजगार व उद्योग व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. मात्र मागील अनेक दिवसांपासून या युवकांना व्याज परतावा मिळत नसल्याने ते मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले असून तातडीने या विभागाला निधी उपलब्ध करून देऊन त्वरित व्याज परतावा मिळावा अशी आग्रही मागणी नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी केली आहे.

आमदार सत्यजित तांबे यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नामदार नरेंद्र पाटील यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, राज्यभरातील अनेक मराठा समाजातील युवकांना या महामंडळाच्या माध्यमातून स्वयंरोजगार व उद्योग व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे अनेक तरुणांनी आपले स्वयंरोजगार व उद्योग व्यवसाय सुरू केले आहेत. मात्र महामंडळामार्फत कर्ज घेतलेल्या अनेक तरुणांना मागील काही महिन्यांपासून निधीच्या अभावी व्याज परतावा मिळालेल्या नाही. उत्तर महाराष्ट्रात सह अहिल्यानगर जिल्हा आणि शिर्डी विभागातही मोठ्या प्रमाणात युवकांना या व्याज परतावा न मिळाल्याने तरुणांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक युवक व्याजामुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. व्याज परतावा न मिळाल्यास संबंधित लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून नवउद्योजकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यातील अनेक युवकांनी या योजनेवर विश्वास ठेवून व्यवसाय सुरू केला आहे . उद्योग व्यवसायामध्ये दररोज अनंत अडचणी आहेत. व्याज परतावा मिळाल्याने या सर्व तरुणांना आर्थिक अडचणीतून बाहेर पडण्यास थोडी मदत होणार आहे. म्हणून सरकारने तातडीने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला निधी उपलब्ध करून देऊन त्वरित बँकेचा व्याज परतावा देण्यात यावा अशी आग्रही मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी केली आहे.

जनतानगर हरिनाम सप्ताह, संगमनेर
बुधवार दि. १३/०५/२०२६ रोजी सायं ४ ते ५.३०
संत नामावलीतील संत चोखोबा महाराज चरित्र कथा


ह.भ.प. रमायणाचार्य
तुषार महाराज खातळे
यांचे अमृतवाणीतून ऐकण्याची संधी, भाविकांनी या संधीचा लाभ घ्यावा

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे



मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

डायलिसीस
सुसज्ज ऑपरेशन थिएटर
सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे
अत्याधुनिक लॅब
अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
KH
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25